**सोलापूर महानगरपालिका,**

मनपा लोगो

**जा.क्र.नआ/वै./ १६८४**
**आयुक्त कार्यालय**
**सोलापूर दि.१६/१०/२०२०**

# -: Walk in Interview :-

**सोमवार, दि.१९/१०/२०२०**
**अर्ज करण्याची वेळ - सकाळी,१०.०० ते १२.०० पर्यंत.**
**थेट मुलाखतची वेळः- ०२.०० वाजता**
**स्थळः- सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन, सोलापूर**

सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत आरोग्य विभाग Covid कडे खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने ६ महिने करीता मानधन तत्वावर पदभरती करणेसाठी खालील पदांसाठी थेट मुलाखत आयोजित करणेत येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | आवश्यक शैक्षणिक अर्हता | भरावयाची पद संख्या | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | रेडिओलॉजिस्ट | MBBS MD(RADIO) DMRD | १ | ५०,०००/ |
| २ | भुलतज्ञ | MBBS DA MD (ANASTHESIA) | १ | ५०,०००/ |

१. सदर सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत Covid care center येथे covid-१९ चे कामकाज करणे बंधनकारक असेल.
२. इच्छुक उमेदवारांनी दि.१९/१०/२०२० रोजी सकाळी,१०.०० वाजता अर्जासोबत i) वयाचा पुरावा ii) पदास आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र व शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका iii) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (as applicable) iv) शासकीय/निमशासकीय संस्थेमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र (असल्यास) v) निवासी पुरावा vi) उमेदवाराचा सद्याचा पासपोर्ट साईजचा फोटोसह सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यासह सामान्य प्रशासन विभाग, सोलापूर महानगरपालिका, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन, सोलापूर येथे स्विकारण्यात येतील.
३. वयोमर्यादा :- कमाल वयोमर्यादा ५० पेक्षा अधिक नसावी.
४. सदरची जाहिरात तसेच अन्य शर्थी व अटी मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे.

(पि.शिवशंकर भा.प्र.से.)
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

**अटी व शर्ती :-**

१) सदर सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत Covid care center येथे covid-१९ चे कामकाज करणे बंधनकारक असेल

२) इच्छुक उमेदवारांनी दि.१९/१०/२०२० रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या कालावधी उमेदवारांनी अर्ज सादर करावायाचे आहे.

३) अर्जासोबत i) वयाचा पुरावा ii) पदास आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र व शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका iii) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (as applicable) iv) शासकीय/निमशासकीय संस्थेमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र (असल्यास) v) निवासी पुरावा vi) उमेदवाराचा सद्याचा पासपोर्ट साईजचा फोटोसह सोबत जोडून सामान्य प्रशासन विभाग, सोलापूर महानगरपालिका, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन, सोलापूर येथे स्विकारण्यात येतील.

४) वयोमर्यादा :- कमाल वयोमर्यादा पेक्षा अधिक नसावी.

५) उमेदवाराने सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्ये पदाचे नांव स्पष्ट नमूद करावे. तसेच खाडाखोड अथवा अवाचनिय अर्ज सादर करु नये अन्यथा संबंधित उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरला जाणार नाही.

६) कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

७) सदरची पदे तात्पुरत्या स्वरुपात असून, करार पध्दतीने सहा महिन्याच्या कालावधीकरीता भरण्यात येणार आहेत.

८) पदासमोर नमूद मानधन असुन, त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही अतिरिक्त भत्ते देय राहणार नाहीत.

९) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१०) शासकीय सेवेत नियमित सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

११) नियुक्ती दिलेल्या उमेदारांनी सोलापूर मुख्यालयी राहुन सेवा देणे बंधनकारक राहील.

१२) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ईमेल आयडी अचुक नोंदवावा.

१३) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्यांची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल.

१४) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार तसेच पदे कमी जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, इ. सर्व अधिकार आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहेत.

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका